विद्यापीठाच्या सभागृहात जनसंवाद सभा रविवारी झाली. यात मार्गदर्शन करताना फडणवीस बोलत होते. व्यासपीठावर प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, आमदार हरीश पिंपळे, आमदार प्रकाश कुट, माजी राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील, आमदार वसंत खंडेलवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकसभा निवडणुका आटोपल्यानंतर महाविकास आघाडीसह महायुतीचे घटक पक्ष आता विधानसभा निवडणुकांच्या कामाला लागले शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनीही राज्यातील मतदारसंघाचे दौरे सुरू केले आहेत. काँग्रेसने इच्छुकांकडून अर्ज मागवले आहेत. त्यापाठोपाठ आता निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाकडून भगवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

# स्वामी विवेकानंद विद्यालयात सायबर सुरक्षा अभियान



अकोट – स्थानिक स्वामी विवेकानंद विद्यालयात क्विक हिल फाउंडेशन पुणे व महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने व शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर सुरक्षा कार्यशाळा घेण्यात आली.

यावेळी शंकरलाल खंडेलवाल विद्यालयातील विद्यार्थी सुमित सपकाळ व अनिकेत भुडके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी सायबर सुरक्षा जागरूकता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. धोके, सुरक्षितता, उपाययोजना आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. वाढती गुन्हेगारी लक्षात घेता व वाढता सोशल मीडियाचा वापर लक्षात घेता आपण ऑनलाइन फसवणुकीला बळी पडत आहोत. तसेच आपण सोशल मीडियावर आपले जे वैयक्तिक फोटो, माहिती शेअर करतो तिचा सुद्धा गैरवापर होताना मोठ्या प्रमाणात दिसत आहे. त्यासोबतच ऑनलाइन फ्रॉड कॉल, बँकेतून ऑटोमॅटिक गायब होणारी रक्कम कशाप्रकारे फ्रॉड करून काढल्या जाते. तसेच मोबाइलचे व्यसन सोडवण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. अभियानाचे उद्घाटन मुख्याध्यापिका जोशी यांनी केले. यावेळी शाळेचे शिक्षक धांडे, चव्हाण व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

अवघ्या आघाड्यांवर कार्यरत भारत
अवघ्या क्षेत्रात सेवारत भारत
स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

- UPI प्रणाली
- इंटरनेट बँकींग सुविधा
- मोबाईल बँकींग /IMPS सेवा
- ANY BRANCH BANKING
- RTGS / NEFT सेवा
- लॉकर्स सेवा

आकर्षक ठेव योजना
किफायतशीर कर्ज योजना

॥ सेवेसाठी आमच्या ३७ शाखा ॥

दि अकोला जनता कमर्शियल को-ऑप. बँक लि; अकोला